International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.455
Volume 3, Issue 4, Oct-Dec 2023 ID: IJCRTA000097 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# कथेचे माध्यमांतर नाटकात – एक अभ्यास

**मधुमालती भाऊराव मोरे**

**Author Affiliation:**
M.A, M.Ed, Net. Solapur, Maharashtra. (India). Email: makkalkote@gmail.com

**Citation of Article:** मोरे, मधुमालती भाऊराव. (2023). कथेचे माध्यमांतर नाटकात – एक अभ्यास. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 3(4), pg. 65-67. ijcrta.org

**प्रास्ताविक:**

'कथा सांगण्याची आणि ऐकण्याची आवड असणारा प्राणी म्हणजे माणूस' अशी माणसाची व्याख्या केल्यास ती चुकीची ठरणार नाही. बालथोरा पासून सारेजण कथा आवडीने ऐकतात. आपल्या पुराणात तर सर्वत्र कथाच कथा आढळतात.

कादंबरी प्रमाणे आधुनिक कथा मराठी मध्ये इंग्रजी वाड्मयाच्या परीशिलनातून आली. १९ व्या शतकानंतर मात्र एक स्वतंत्र वाड्मय प्रकार म्हणून कथा-वाड्मय उदयास आले. हरीभाऊपासून ती विकसित झाली.

**व्याख्या:**

कथा या वाड्मय प्रकारची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. तरी काही विचारवंतांनी कथेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला तो पुढीलप्रमाणे –

१) फार दीर्घ नसलेली गोष्ट म्हणजे कथा – जॉन हॅडफिल्ड
२) मनावर एकच परिणाम करणारी गोष्ट म्हणजे कथा – प्रख्यात साहित्यिक पो
३) शक्य तितक्या परिणामकारक रीतीने आणि शक्य तितक्या कमी पात्रप्रसंगाच्या सहाय्याने सांगितलेली एकच गोष्ट म्हणे लघुकथा होय – ना.सी.फडके

**कथेची वैशिष्ट्ये:**

कथेची काही वैशिष्ट्ये देखील आपल्याला सांगता येतील जसे –

१) कथेत कोणती तरी एकच घटना खुलवून सांगितली जाते.
२) कथेत पात्रांची संख्या मर्यादित असते.
३) कथेची सुरुवात आकर्षक आणि शेवट परिणामकारक असतो .
४) कथानक हा कथेचा मूल घटक असतो.
५) कथालेखन हे शैलीनुसार भिन्न भिन्न असते आणि शैली ही लेखकानुसार भिन्न भिन्न असते.
६) कथेतून त्या त्या समाजाचे चित्रण केले जाते.
७) प्रबोधन आणि मनोरंजन या दोन उद्देशाने कथा लिहिल्या जातात.
८) ठराविक कालखंडानंतर कथेचे स्वरूप बदलत गेले आहे.

या सर्व वैशिष्ट्यामुळेच कादंबरी, नाटक व कविता या वाड्मय प्रकाराहून कथा ही वेगळी मानली जाते. कथेमध्ये ऐतिहासिक कथा, भयकथा, रहस्यकथा, वैज्ञानिक कथा, विनोदी कथा, कौटुंबिक कथा, नागर कथा, दलित कथा ई. अनेक प्रकार आहेत.

अर्वाचीन कालखंडामध्ये मराठी कथालेखनाला प्रेरणा देण्याचे आणि त्या कथा वाचकांपर्यंत पोहचवण्याचे महत्वाचे कार्य मासिकांनी केले. त्यामुळे वाचकांची गरज लक्षात घेऊन विविधतेवर भर देण्यात आला. पुरुष वाचकांबरोबरच स्त्री वाचकांची संख्याही वाढू लागली. जुन्या कथेची नाळ तोडून आपला स्वतंत्र असा कथेचा प्रवास सुरू झाला. माजघरात घुटमळणारी कथा जीवनाच्या रणसंग्रामात उतरली. नवनवे विषय, नवी भाषा, नवी रचना यामुळे कथेच्या क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले.

वाचकांना अस्वस्थ करण्याचे सामर्थ्य कथाबिजात असते. बऱ्याचदा लेखकाला हवा तसा कथेचा विस्तार करता येत नाही. वाचकांची अस्वस्थता जाणून साहित्यिक कथेचे कधी कादंबरीत, कधी नाटकात तर कधी चित्रपटात माध्यमांतर करतात.

**माध्यमांतर:**

सर्वप्रथम माध्यमांतर म्हणजे काय हे समजून घेऊ.

साहित्यकृतीच्या माध्यमांतराची व्याख्या करताना डॉ.शकील शेख सर म्हणतात, "कोणतीही एक लेखन कलाकृती मग ती कविता असो, कथा असो, कादंबरी असो, एकांकिका असो, नाटक असो, चरित्र असो कि आत्मचरित्र असो त्याचे त्याच्या मूळ रूपातून दुसऱ्या रुपात रूपांतरीत करणे यालाच माध्यमांतर म्हणतात."

प्रा.प्रमोद चौधरी यांनी देखील अशीच व्याख्या केली आहे ते म्हणतात," एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात रुपांतरीत होण्याच्या प्रक्रियेस आपणास माध्यमांतर म्हणता येईल.

एखादी साहित्यकृती जेंव्हा लोकप्रिय होते तेंव्हा त्या कलाकृती संबंधी अनेकांच्या मनात जिज्ञासा, कुतुहूल असते. लोकप्रिय, जिज्ञासावर्धक अशी कलाकृती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी माध्यमांतरासारखे दुसरे साधन असूच शकत नाही.

कधी कधी साहित्यिक एखादी साहित्य कलाकृती लिहतो. आपल्या मनात घोळत असलेला विषय तो त्या साहित्यकृतीत मांडतो. पण ती साहित्यकलाकृती लिहून पूर्ण झाल्यानंतरही त्या साहित्यकलाकृतीत आलेला तो विषय पूर्ण झाला नाही किंवा तो विषय संपला नाही अशी त्याची धारणा होते. त्या साहित्य कलाकृतीत आलेला तो विषय, आशय, विचार आणखी पुढे विस्तारित करता येऊ शकतो असा तो विचार करतो आणि तो त्या साहित्यकलाकृतीचे विस्तारीकरण करून त्याला योग्य न्याय देण्यासाठी त्याचे माध्यमांतर करतो. येथे एक कलात्मक गरज म्हणून त्या साहित्यिकाने हे माध्यमांतर केलेले असते. व्यक्ती आपली श्रद्धा, भावना, आदर, प्रेमासाठी वाटेल ती किंमत मोजण्यास तयार होतो त्यामुळे व्यावहारिक गरज लक्षात घेऊन माध्यमांतर केले जाते.

**कथेचे माध्यमांतर नाटकात:**

कथा साहित्यप्रकारातील एखादे पात्र, घटना, नाट्यमय प्रसंग, विचार, पात्रांचे, हाव-भाव या सगळ्यातून लेखकाच्या मनात कथेप्रमाणेच नाटक तयार होऊ शकते, हा विचार येतो त्याच वेळी त्या कथेतील कथानकाला, पात्रांना, प्रसंगांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी त्या कथेचे नाटकात माध्यमांतर लेखक करतो.

कथेत व्यक्त झालेल्या मानवी मनातील काम, क्रोध, मद, मत्सर, स्वार्थ या भावना जर त्या कथेत वादळ निर्माण करत असतील, तर लेखकाच्या मनात त्या कथेचे माध्यमांतर नाटकात करण्याकडे अनेक लेखकांचा कल जास्त आहे.

यामध्ये प्रामुख्याने जयंत दळवी यांचे नाव प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या अनेक कथांचे नाटकामध्ये माध्यमांतरझाले आहे. 'बॅरिस्टर' या कथेचे 'बॅरिस्टर' हे नाटक, 'सभ्य गृहस्थ हो' या कथेवरून 'सभ्य गृहस्थ हो' हे नाटक, 'स्पर्श' या कथेवरून 'स्पर्श' हे नाटक, 'वाट सरेना' या कथेवरून 'संध्या-छाया' हे नाटक लिहले गेले.

लेखिका उषा दातार यांच्या 'काकस्पर्श' या कथेवर आधारित 'जन्मगाठ' हे नाटक आले. 'काकस्पर्श' या कथेचे माध्यमांतर 'जन्मगाठ' या नाटकामध्ये माधव चिरमुले यांनी केले. कथेचे नाटकात माध्यमांतर करताना कथेतील पात्र, भाव-भावना, ठिकाण, राजकीय आणि सामजिक घटना यांना योग्य न्याय दिल्यामुळे हे नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस पडते.

मराठी भाषेतील विविध कथांचे आज नाटकात माध्यमांतर होत आहे विशेष करून प्रेक्षकांची आवड-निवड लक्षात घेऊन कथांचे नाटकात माध्यमांतर करण्याकडे माध्यमांतरकरांचा कल दिसून येतो.

**निष्कर्ष:**

कथा या साहित्यप्रकारचे कादंबरी, नाटक, चित्रपट अशा विविध माध्यमांमध्ये माध्यमांतर करता येते. कथा जर रोचक असेल तर त्याचे माध्यमांतर देखील यशस्वी ठरते. कथेचे माध्यमांतर करताणा माध्यमांतरकाराने मूळ कथेत कोणताही बदल करताना परीणामाचा विचार करावा. सगळीच माध्यमांतर योग्य न्याय देतील असे होत नाही. त्यामुळे कथेचा गाभा लक्षात घेऊन त्यानुसार कोणतेही माध्यमांतर करावे. मुख्यत्वे कथेचे माध्यमांतर हे कथेचा विस्तार या दृष्टीकोनातुनच होते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) **डॉ.शकील शेख** – साहित्यकृतींच्या माध्यमांतराचे स्वरूप.
२) **प्रा. चौधरी प्रमोद** – माध्यम संकल्पना – प्रकार व वैशिष्ट्ये, साहित्यकृतींचे माध्यमांतर (हरनाई प्रकाशन, नांदेड).
३) **यादव आनंद** – साहित्य निर्मिती प्रक्रिया (मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे).
४) **डहाके वसंत आबाजी** – दृश्यकला आणि साहित्य (लोकवाङ्मय गृह, मुंबई).
५) **डॉ.व्यवहारे निशिगंध** – पटकथा लेखन : संकल्पना व तंत्र , साहित्यकृतीचे माध्यमांतर (हरनाई प्रकाशन, नांदेड).
६) **डॉ. शेख शकील** – माध्यमांतर मीमांसा (लुला पब्लिकेशन्स, युनायटेड स्टेट).